**क्रमांक : पोमसं/६/पोशि-सपोउनि/आंजिब/धोरण/१०५/२०१६,** **मुंबई,** **दिनांक : ३१.१०.२०१७**

**संदर्भ :-** **१.** शासन गृह विभाग, आदेश क्र.सेप्रनि/-२३१६/प्र.क्र.४७५/पोल-५अ, दि.१९.९.२०१७
**२.** शासन गृह विभाग, निर्णय क्र.संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब, दि.२६.१०.२०१७.
**३.** या कार्यालयाचे ज्ञापन समक्रमांक दि.१७.१.१७ व पत्र/पृष्ठांकन समक्रमांक, दि.२५.९.१७

**विषय :-** राज्य पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक गटातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या घटक बदली संदर्भातील नियमावलीस मान्यता देण्याबाबत.

********

उपरोक्त संदर्भ क्र. २ मधील नमूद शासन निर्णयाची प्रत, त्यासोबतच्या शासनमान्यताप्राप्त नियमावलीच्या प्रतीसह सुलभ संदर्भाकरिता सोबत जोडली आहे.

त्याअनुषंगाने सर्व पोलीस आयुक्त / अधीक्षकांना कळविण्यात येते की, "सन २०११ व त्यानंतर पोलीस दलात "पोलीस शिपाई" पदावर भरती झालेल्या आणि पती-पत्नी एकत्रिकरण व स्वत:चे अथवा कुटूंबातील सदस्यांच्या गंभीर आजारावरील वैद्यकीय कारणास्तव आंतरजिल्हा बदली करणेबाबत" या कार्यालयाचे ज्ञापन समक्रमांक, दि.१७.१.२०१७ ला अनुसरुन सर्व पोलीस आयुक्त / अधीक्षकांकडुन या कार्यालयास प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव लवकरच परत करण्यात येत आहे.

तरी सर्व पोलीस आयुक्त / अधीक्षकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी, त्यांच्या घटकातून अन्य घटकात बदलुन जाण्यास इच्छुक असलेल्या व अन्य घटकातुन त्यांच्या घटकात बदलुन येण्यास इच्छुक असलेल्या पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतच्या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांच्या विनंती अर्जांवर, यातील परिच्छेद १ मधील शासन मान्यताप्राप्त नियमालीतील तरतुदींनुसार त्यांचे स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी.

(राजकुमार व्हटकर)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
सर्व पोलीस आयुक्त.
सर्व पोलीस अधीक्षक.

प्रत, अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग म.रा., मुंबई
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक.
पोलीस उपमहानिरीक्षक (गडचिरोली.) कार्यासन अधिकारी का.क्र.३६ (अभिलेख नस्ती)

२. यांना यातील परिच्छेद १ मधील शासन निर्णयाची प्रत, त्यासोबतच्या नियमावलीच्या प्रतीसह अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

प्रत सादर अग्रेषित,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई.
(शासन गृह विभाग, निर्णय क्र.संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब, २६.१०.२०१७ ला अनुसरुन.)

राज्य पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक गटातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या घटक बदली संदर्भातील नियमावलीस मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २६ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ :- पोलीस महासंचालक यांचे पत्र क्रमांक-पोमसं/६/पोशि-सपोउनि/आंजिब/धोरण/१०५/२०१६, दि.२५.०९.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना

राज्य पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या एका घटकातून दुसऱ्या घटकात बदली संदर्भात नियमावलीस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत पोलीस महासंचालक, मुंबई यांनी दिनांक २५.९.२०१७ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. त्या अनुषंगाने राज्य पोलीस कर्मचाऱ्यांच्या घटक बदली संबंधातील नियमावलीस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवा प्रवेश) नियम, २०११ मध्ये नियम ३ (२) उपखंड (अ) मधील तरतूदीनुसार राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (रा.रा.पो.बल गटातील कर्मचारी वगळता) गटातील कर्मचाऱ्यांच्या सोबत जोडलेल्या घटक आस्थापना बदली नियमावलीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. पोलीस महासंचालक यांनी यासंदर्भात पुढील आवश्यक कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेताक २०१७१०२६१२०७१४२४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

V. M. Bhat

Digitally signed by V. M. Bhat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5f0272b97156a5d2812bad6725ca46fb2671d1da08208cfdd6677fac0afd6bf2, cn=V. M. Bhat
Date: 2017.10.27 15:57:07 +05'30'

(व्यं.मा.भट)
उप सचिव, गृह विभाग.

प्रत,

१) मा.राज्यपालांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा.राज्यमंत्री, गृह (शहरे / ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
४) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
५) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहाय्यक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (अपिल व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई
८) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
९) सर्व पोलीस आयुक्त
१०) सर्व पोलीस अधिक्षक

शासन निर्णय गृह विभाग क्र. संकीर्ण १०१० / ३८४३ / प्र.क्र ४६३ / पोल ५ब दि. २५/१०/१६



महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक (रा.रा.पो.बल गटातील कर्मचारी वगळता) दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या घटक बदलीसंबंधातील नियमावली.

********

१. **नाव** :- या नियमावलीस ''महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक (रा.रा.पो.बल गटातील कर्मचारी वगळता) दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या घटक आस्थापना बदली नियमावली'' असे संबोधण्यात येईल.

२. **पात्रता** :- राज्य पोलीस विभागातील एका घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पो.शि. / पो.ना. / पो.हवा. / स.पो.उ.नि. स्वेच्छेने अन्य घटकात घटक बदलीने जाण्यास, खालील अटींची पूर्तता करीत असल्यास, त्याला, घटक बदलीस पात्र समजण्यात येईल :-

i. घटक बदलीस इच्छुक पोलीस कर्मचाऱ्याची नियुक्ती नियमित असावी व त्याला/तिला स्थायित्व प्रमाणपत्र दिले असावे.

ii. मूळ घटकात किमान ८ वर्ष सेवा पूर्ण झाली असावी. मात्र, खालील नमूद अपवादात्मक परिस्थितीत मूळ घटकात कमीत-कमी ३ वर्षे सेवा पुर्ण केल्यानंतर व वर नमूद अट क्र. १ ची पूर्तता करीत असल्यास, संबंधीताची विनंती विचारात घेता येईल :-

१. पती-पत्नी एकत्रिकरण प्रकरणी. **(पती किंवा पत्नी शासकीय अथवा निम-शासकीय सेवेत असल्यासच लागु होईल.)**

२. कर्मचाऱ्याचा स्वत:चा, पत्नीचा, आईचा, वडिलाचा अथवा मुलाचा गंभीर वैद्यकिय आजार. (सक्षम अधिकारी गरज वाटल्यास शल्य चिकित्सक कडून अहवाल प्राप्त करुन घेतील.)

३. नक्षलवादी / अतिरेकी हल्ल्यातील पीडीत कुटूंबातील पोलीस कर्मचारी.

iii. एका वर्षात त्या घटकातील एकूण मंजूर पदांच्या ५% पेक्षा जास्त कर्मचारी आंतरघटक बदलीवर सोडण्यात येणार नाहीत.

iv. एकदा घटक बदलीने बदलुन गेल्यानंतर, तो बदली आदेश रद्द करुन, पुन्हा पुर्वीच्या आयुक्तालय / जिल्हा पोलीस दलात घटक बदलीने परत जावयाचे झाल्यास, तत्पुर्वी त्याची ज्या आयुक्तालय / जिल्हा पोलीस दलात बदली झालेली आहे, तेथे किमान २ वर्षे इतकी सेवा पुर्ण करणे आवश्यक आहे.

v. रा.रा.पो.बलातील ज्या पोलीस कर्मचाऱ्याची रिक्त पदांअभावी इच्छित जिल्ह्याऐवजी अन्य आयुक्तालय / जिल्हा पोलीस दलात, जिल्हा बदली झालेली आहे, अशा पोलीस कर्मचाऱ्याला जर इच्छित आयुक्तालय / जिल्हा पोलीस दलात घटक बदलीवर पुन्हा जावयाचे झाल्यास, त्या कर्मचाऱ्यास, त्या आयुक्तालय / जिल्हा पोलीस दलात किमान २ वर्ष सेवा पूर्ण करणे आवश्यक राहील.

vi. संपूर्ण सेवाकाळात फक्त २ वेळा घटकबदली देय राहील.

३. **घटक बदली प्रक्रिया** :- राज्य पोलीस विभागातील पो.शि. ते स.पो.उ.नि. यांच्या घटक बदलीसाठी खालील प्रक्रिया राहील :-

i. घटक बदलीसाठी इच्छुक कर्मचारी सर्वप्रथम त्याच्या घटक प्रमुख (पोलीस आयुक्त / अधीक्षक) यांना वरील अटी व शर्तीची पूर्तता व अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रतींसह आपला दिनांकीत स्वाक्षरीकृत विनंती अर्ज सादर करील व त्या अर्जाची एक प्रत, त्याला ज्या घटकात घटक बदलुन जावयाचे आहे, त्या घटक प्रमुखास माहितीस्तव सादर करील.

उप सचिव
गृह विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

...२...

ii. असे अर्ज, आस्थापना प्रमुख पोलीस आयुक्त / अधीक्षक आपल्या आस्थापनेवरील आस्थापना मंडळासमोर ठेवतील. मंडळ त्यावर आवश्यक त्या सर्व छाननीअंती संबंधीत पोलीस कर्मचाऱ्यांना घटक बदलीसाठी पात्र-अपात्रतेसंबंधात १ महिन्याच्या आत निर्णय घेतील. त्यानुसार घटक प्रमुख घटकबदलीस पात्र पोलीस कर्मचाऱ्याची प्रकरणे, संबंधीत कर्मचाऱ्यास ज्या घटकात बदलुन जावयाचे आहे, त्या पोलीस आयुक्त / अधीक्षक यांच्याकडे, त्यांच्या घटकात, त्या कर्मचाऱ्याला सामावुन घेण्यासंबंधातील संमतीपत्र मागविण्यासाठी, कर्मचाऱ्याचे सेवापट, सेवाभिलेख, प्रस्तावित किंवा प्रलंबित विभागीय / प्राथमिक / न्यायालयीन चौकशीसंबंधातील (असल्यास) तपशिलासह पाठवतील. तसेच आस्थापना मंडळाकडुन ज्या पोलीस कर्मचाऱ्याचे घटक बदलीसंबंधातील विनंती अर्ज घटक बदलीसाठी अपात्र ठरविले आहे, त्याबाबत घटकप्रमुख संबंधीत पोलीस कर्मचाऱ्यास विनंती अमान्य करण्याबाबतच्या कारणमिमांशासह लेखी स्वरुपात / पोलीस पत्रकाद्वारे त्वरित अवगत करतील.

iii. अशी प्रकरणे ज्या पोलीस आयुक्त / अधीक्षक यांना प्राप्त होतील, त्यांनी ती प्रकरणे त्यांच्या आस्थापनेवरील आस्थापना मंडळासमोर त्वरित सादर करुन, त्यावर मंडळाचे निर्णय प्राप्त करुन घेतील. त्यातील निर्णयानुसार प्रकरण घटकात प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन १ महिन्याच्या आत त्यांचे संमतीपत्र संबंधीत पोलीस आयुक्त / अधीक्षक यांना पाठवतील.

iv. संमतीपत्र प्राप्त झालेली सर्व प्रकरणे वेळोवेळी तात्काळ निर्गती करण्याची दक्षता संबंधित घटक प्रमुख घेतील. मात्र, कोणत्याही परिस्थीतीत दरवर्षी सर्वसाधारण बदली / सर्वसाधारण पोलीस भरती पूर्वी निर्णय घेवून, प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घेतील.

v. त्या आदेशानुसार आदेशित पोलीस कर्मचारी आपल्या आस्थापनेवर हजर होताच, त्याला आपल्या घटकात त्वरित हजर करुन घेतील व त्याबाबतचा अहवाल संबंधीत पोलीस आयुक्त/अधीक्षकांना सादर करतील. तसेच आपल्या घटकात त्याची सेवाज्येष्ठता यातील निकषानुसार त्वरित निश्चित करतील.

४. **सक्षम प्राधिकारी :-**

i. राज्य पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचाऱ्यांची घटक बदली करण्यास संबंधीत कर्मचारी सध्या ज्या घटकात कार्यरत आहे, त्या घटकाचे (पोलीस आयुक्त / अधीक्षक) आस्थापना मंडळ आणि त्या कर्मचाऱ्यास ज्या घटकात घटकबदलीने जावयाचे आहे, त्या घटकातील (जिल्हा पोलीस अधीक्षक / आयुक्तालय) आस्थापना मंडळ सक्षम प्राधिकारी राहतील.

ii. राज्य पोलीस विभागातील कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्यांची जनहितार्थ किंवा प्रशासकिय निकड म्हणून कोणत्याही अन्य घटकात बदली करण्यास महाराष्ट्र शासन तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील आस्थापना मंडळ क्रमांक २ सक्षम प्राधिकारी राहतील.

उप सचिव
गृह विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

५. **सेवाज्येष्ठता :-** राज्य पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचाऱ्याच्या घटक बदलीनंतर, बदली झालेल्या घटकात त्या पोलीस कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता, त्याची महाराष्ट्र पोलीस दलातील "पोलीस शिपाई" या पदावरील भरती दिनांक ग्राह्य धरण्यात येऊन, त्या दिनांकाच्या वर्षी, घटक बदली झालेल्या घटकात "पोलीस शिपाई" या पदावर भरती झालेल्या व त्या वर्षी सेवेज्येष्ठतेत सर्वात कनिष्ठ असलेल्या शेवटच्या पो.शि. याचे खाली निश्चित होईल. तसेच ज्या कर्मचाऱ्याचे एकापेक्षा अधीक वेळी घटक बदली करण्यात आलेली आहे, अशा पोलीस कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठतादेखील याच निकषानुसार निश्चित होईल.

६. **इतर अटी :-**

i. ज्या घटकात बदलून जाण्यास विनंती केली आहे, त्या घटक प्रमुखाने त्यांचेकडील प्रवर्गनिहाय रिक्त पदे, कर्मचाऱ्यांचे अभिलेख व इतर प्रशासकीय बाबी तपासून त्या विनंतीवर सांगोपांग विचार करुन, त्वरित निर्णय घेवून, संबंधित घटकास त्वरित कळवावे. जर, त्यावेळी त्या जातप्रवर्गाच्या जागा रिक्त नसतील, तरीही त्यांना बदलीवर स्वीकारुन, भविष्यात निर्माण होणाऱ्या त्या प्रवर्गाच्या रिक्त पदामध्ये समायोजन करता येवू शकेल. मात्र, त्याबाबतचा जाणीवपूर्वक निर्णय संबंधीत घटक प्रमुखांनीच घ्यावयाचा आहे.

ii. ज्या कर्मचाऱ्यांना घटक बदलीबाबत काही अडचणी / तक्रारी असतील, त्यांनी, घटकाचे वरील पर्यवेक्षकीय अधिकारी यांचे आज्ञांकित कक्षात हजर राहून त्यांचे गाऱ्हाणे मांडावे. असे गाऱ्हाणे प्राप्त होताच, संबंधीत पर्यवेक्षकीय अधिकारी आपल्या अखत्यारीतील संबंधीत घटक प्रमुखांना यथायोग्य त्वरित आदेश देऊन, योग्य निवारण करतील.

iii. घटक बदली आदेश निर्गमित करतांना संबंधित घटक प्रमुख, आपल्या घटकात दिर्घ काळ जास्त पदे रिक्त राहणार नाहीत, याची योग्य दक्षता घेऊन एका वर्षात किती कर्मचाऱ्यांना घटकाबाहेर बदलीवर पाठवावयाचे आहे, आपल्या घटकातुन घटक बदलीने जाऊ इच्छिणाऱ्या व आपल्या घटकात घटक बदलीने येऊ इच्छिणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या आकडेवारीचा सर्वंकष आढावा घेऊन, धोरणात्मक निर्णय घेतील.

iv. सर्व घटक प्रमुख सर्व विनंती अर्जांवर १ महिन्याच्या आत निर्णय घेतील. अशी प्रकरणे विनाकारण प्रलंबित राहणार नाहीत, याची सर्व घटक प्रमुख दक्षता घेतील.

v. दरवर्षी होणाऱ्या पोलीस भरतीची जाहिरात देण्यापूर्वी सर्व विनंती अर्जांवर निर्णय घेणे सर्व घटकांना बंधनकारक राहील.

७. राज्य राखीव पोलीस बलातुन आयुक्तालय / जिल्हा पोलीस दलात जिल्हा बदलीने बदलुन आलेल्या पोलीस कर्मचाऱ्याची, त्या जिल्हा पोलीस दल / आयुक्तालयात त्याची सेवाज्येष्ठता निश्चित करणेबाबत शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या / करण्यात येणाऱ्या शासन आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

---ooo---

(स्वाक्षरी)
उप सचिव
गृह विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२